शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर या संस्थेतील बांधकामाबाबत उद्भवलेल्या लवाद प्रकरणी जिल्हा न्यायालय नागपूर यांजकडे जमा करण्याकरीता पुरक मागणीव्दारे मंजूर झालेला निधी वितरीत करण्यास मंजूरी देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: तशिपू-३३१९/(प्र.क्र.९२/१९)/तांशि-३,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक:- १६ ऑगस्ट, २०१९

संदर्भ:-

१) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.जिटीआय-१०९२/२७१२२(२२९८)/तांशि-२, दि.८ जून, १९९२.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.जिटीआय-१०९२/२४५३(१)/तांशि-२, दि.२८ मे, १९९३.
३) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.जिटीआय-१०९३/२६४९(८६)/तांशि-२, दि.१८ नोव्हेंबर, १९९३.
४) मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे विशेष अनुमती याचिका क्र.५२४७-५२४८/२००७, दि.१२ एप्रिल, २०१७ चे आदेश.
५) मा.जिल्हा न्यायालय, नागपूर यांचे आर.डी.क्र.३/२००५, दि.१६ एप्रिल, २०१८ चे आदेश.
६) संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.९(२)/नियोजन/२०१९/१३६, दि.२८ मे, २०१९
७) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८ जुलै, २०१९.
८) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.पूरक-२०१९/प्र.क्र.९३/अर्थ-३, दि.०९ जुलै, २०१९.
९) संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.९(१)/नियोजन/२०१९/२४३, दि.२५ जुलै, २०१९.

प्रस्तावना:-

शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर या संस्थेतील परिसरात कार्यशाळा, वसतिगृह तसेच मुलींच्या वसतिगृह बांधकामाबाबत उदभवलेल्या लवाद प्रकरणी जिल्हा न्यायालय, नागपूर यांच्या आरडी क्र.३/२००५, दि.१६ एप्रिल, २०१८ च्या आदेशानुसार मे.रामदास कन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर यांना देय ठरविलेली डिक्रीटेयल रक्कम रु.२,४६,३३,२६१/- सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्हा न्यायालय, नागपूर यांच्याकडे जमा करावयाची आहे. त्याकरीता विधीमंडळाच्या जून, २०१९ च्या पावसाळी अधिवेशनात पूरक मागणीव्दारे अर्थसंकल्पित झालेला रु.२,४६,३३,२६१/- इतका निधी वितरीत करण्यासाठी संचालकांनी संदर्भाधीन दि.२५ जुलै, २०१९ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला होता.

शासन निर्णय:-

शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर या संस्थेतील परिसरात कार्यशाळा, वसतिगृह तसेच मुलींच्या वसतिगृह बांधकामाबाबत उदभवलेल्या लवाद प्रकरणी जिल्हा न्यायालय, नागपूर यांनी दि.१६ एप्रिल, २०१८ च्या आदेशानुसार मे.रामदास कन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर यांना देय ठरविलेली

डिक्रीटेयल रक्कम रु.२,४६,३३,२६१/- (अक्षरी रुपये दोन कोटी शेहेचाळीस लक्ष तेहत्तीस हजार दोनशे एकसष्ट फक्त) इतकी रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्हा न्यायालय, नागपूर यांच्याकडे करण्यास याव्दारे मंजूरी देण्यात येत आहे. तसेच हा निधी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांच्यामार्फत अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांना बीडीएस प्रणालीव्दारे उपलब्ध करुन देण्यात यावा.

२. यासाठी होणारा खर्च "मागणी क्र.डब्ल्यू-३, २२०३,तंत्र शिक्षण ००१, संचालन व प्रशासन (०१) संचालन व प्रशासन (०१) (०१) संचालक, तंत्रशिक्षण (अनिवार्य खर्च) (२२०३ ००१३) ५०-इतर खर्च" या लेखाशिर्षाखाली खर्ची दर्शविण्यात यावा व तो सन २०१९-२० च्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.५००/१९/व्यय-५, दि.३० जुलै, २०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा सांकेतांक २०१९०८०८११३६२०२५०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANALI MILIND SAMANT

Digitally signed by MANALI MILIND SAMANT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a393e9553ec410a2133a89ca969ca76abd4ca892102ef711a7fff2d0c54599c7, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=c63b0a0419f0eb37099daca08e4cccce3bf49154bf43e8881e68ac2ca3a46392, ou=HIGHER AND TECH, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MANALI MILIND SAMANT
Date: 2019.08.16 12:49:42 +05'30'

(मनाली सामंत)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
३. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
४. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
५. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.
६. कार्यकारी अभियंता, एकात्मिक घटक (वैद्यकीय) सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर.
७. कोषाधिकारी, कोषागार कार्यालय, नागपूर.
८. नियोजन विभाग /वित्त विभाग, मंत्रालय मुंबई.
९. कार्यासन साशि-१, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती/तांशि-३.